संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# सरकारी आरोग्य योजनांमधले अनारोग्य

**सध्याच्या** आरोग्य व्यवस्थेविषयी सरकारी यंत्रणांचा मोठाच गैरसमज झालेला आहे. केंद्र सरकारने मोठा गाजावाजा करून सुरू केलेली 'आयुष्यमान भारत योजना' किंवा यापूर्वीच्या सरकारने लागू केलेली 'राजीव गांधी आरोग्य योजना' आणि राज्य सरकारकडून राबवली जात असलेली 'सावित्रीबाई फुले आरोग्य योजना' या सगळ्यांचा एकत्रित विचार केला तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या कोणत्याही व्यक्तीला जवळपास पाच ते सात लाखांपर्यंतचे आरोग्य कवच प्राप्त होऊ शकते. या योजना सुरू केल्यामुळे समाजातील गरीब वर्ग महागड्या आरोग्य सेवेपासून वंचित राहाणार नाही आणि त्याला आपल्या आरोग्याची योग्य ती काळजी घेता येईल, असा त्यामागचा उद्देश होऊ लागला आहे. परंतु गेल्या काही दिवसांतला या योजनांमधला सगळा घोळ बघितला तर या आरोग्य योजना रुग्णांना त्यातही प्रामुख्याने गरीब वर्गाला बऱ्या करणाऱ्या आहेत की आजारी पाडणाऱ्या आहेत असा प्रश्न निर्माण होतो. आपल्या छोट्या -मोठ्या दुखण्यासाठी दवाखान्यात पोहचलेला गरीब माणूस राजीव गांधी योजनेचे कार्ड दाखवतो आणि मग त्या कार्डावर असलेली वैद्यकीय खर्चाची मर्यादा कशी वसूल होऊ शकेल अशी चक्रे फिरायला लागतात. आरोग्याविषयी फारशी माहिती नसलेला हा वर्ग डॉक्टर सांगतील त्या गोष्टींवर विश्वास ठेवतो आणि मग या योजनेअंतर्गत उपचारासाठी आलेल्या गरीबाच्या कार्डावरील पैसे हॉस्पिटलला कसे मिळतील अशी सगळी चक्रे फिरायला लागतात. त्या व्यक्तीला छोटासा जरी आजार झाला असला तरी त्याचे स्वरूप मोठे केले जाते. नको असलेल्या शस्त्रक्रिया त्याच्या माथी मारल्या जातात आणि उपचारासाठी गेलेला हा माणूस अनेक वेळेला नव्या व्याधी घेऊनच घरी येतो, असेही प्रकार मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहेत. अनेक रुग्णांची हृदय तपासणी जाणीवपूर्वक केली जाते आणि जवळपास जबरदस्तीने एन्जोग्राफी किंवा एन्जोप्लास्टी हे उपचार लादले जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. म्हणूनच या सरकारी योजना रुग्णांना बऱ्या करणाऱ्या आहेत की आजारी पाडणाऱ्या आहेत, असाच मूलभूत प्रश्न उपस्थित होतो.

### रुग्णालयांची कमाई

या तीनही योजनांच्या माध्यमातून मोठ्या रुग्णालयांमध्ये उपचार घेता येणे शक्य झाल्याने या मोठ्या रुग्णालयांचा सगळा भपकाही मोठा असतो आणि तिथे दबक्या पावलाने गेलेल्या रुग्णाला सावज सापडल्याप्रमाणे जाळ्यात पकडले जाते. आज या योजनांसाठी तरतूद केलेल्या रकमेपैकी जवळपास ऐंशी टक्के रक्कम खर्च होताना दिसते. याचा अर्थ संबंधित रुग्णालयांकडूनच सरकारी योजनांतर्गत येणाऱ्या रुग्णांवर अनावश्यक उपचार लादले जातात. पैसा परस्पर सरकारकडून मिळत असल्याने रुग्णालयाला त्याची चिंता वाटत नाही उलट या सरकारी योजनांमुळे अनेक रुग्णालयांना दर महिन्याच्या निश्चित उत्पन्नाची हमी मिळाल्यासारखी परिस्थिती आहे आणि असे हे उत्पन्न मिळत राहावे म्हणून सर्व मोठ्या रुग्णालयांना राजीव गांधी जीवनदायी योजना आणि सावित्रीबाई फुले योजनांसाठी स्वतंत्र पक्ष उभारले आहेत. एवढेच नव्हे तर या सरकारी योजनांचे मार्केटिंग करून आरोग्यविषयक जनजागृतीच्या नावाखाली रुग्णांना रुग्णालयापर्यंत खेचून आणण्याचा उपाय शोधला गेला आहे. यासाठी अनेक रुग्णालये मोफत आरोग्यशिबीरे भरवतात. सल्ला देतात आणि तुमच्याकडे जर राजीव गांधी किंवा अन्य कुठल्याही योजनेचे कार्ड असेल तर तुम्हाला त्याबाबत खर्चाची चिंता करण्याची गरज नाही, असे आश्वासनही दिले जाते. सध्या कुठलीही व्यक्ती आपल्या तब्येतीविषयी खूपच काळजी घेत असते. धावपळीचे आणि धकाधकीच्या जीवनामध्ये आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष होऊ नये. शिवाय सरकारी योजनेतून खर्च होत असेल तर मग उपचारांसाठी हयगय का करायचे असाही विचार केला जातो आणि उपचार केले जातात. एकूण रुग्णसंख्येपैकी पन्नास टक्के लोकांवरील उपचार हे अनावश्यक किंवा लादलेले असल्याचेच समोर आले आहे. धडधडीतपणे आरोग्याच्या नावाखाली चालणारा भ्रष्टाचार कठोरपणे शोधला गेला पाहिजे. केवळ सरकारी योजना आहेत म्हणून उपचारांचा सपाटा लावला जाणे किंवा अशा रुग्णांना शोधून आपले उत्पन्न वाढवणे हे प्रकार सरकारी पैसा हडप करणारे तर आहेतच, पण त्याहीपेक्षा गरिबांच्या आरोग्याशी खेळ करणारे ठरू शकतात.

### आर्थिक कमकुवतपणाचा गैरफायदा

यासंदर्भात कोणताही लोकप्रतिनिधी किंवा रुग्णालयांशी संबंधित सामाजिक संघटनांचे प्रतिनिधीसुध्दा स्पष्टपणे बोलायला तयार नाहीत. अनेकांचे हितसंबंध त्यात गुंतलेले असतात. बिनबोभाटपणे चाललेला हा संगनमताचा गैरव्यवहार तपासला गेला पाहिजे. कारण सरकार फक्त योजना जाहीर करून मोकळ्या होतात आणि त्यातली रक्कम खर्च होत आहे, हे पाहून लोक या योजनेचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करीत असल्याचे समाधानही मानून घेतात. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. सरकारी आरोग्यदायी योजना या रुग्णांपेक्षाही रुग्णालयांनाच वरदान ठरत आहेत आणि मग त्याच्यावर नजर ठेवणारी सरकारी यंत्रणाही उभारली गेली पाहिजे. म्हणजेच या आरोग्यदायी योजनांमध्ये अनारोग्य तपासता येईल किंवा नाहीसे करता येऊ शकेल. केवळ त्याचा लाभ घेणारी व्यक्ती सामान्य कुटुंबातली आहे आणि तिच्या आर्थिक कमकुवतपणाचा गैरफायदा घेऊन रुग्णालयांकडून ज्या पध्दतीने तिचे शोषण केले जात असेल, तर ते आणखीनच चिंताजनक ठरते. एकाचवेळी अनेक योजना असल्यामुळे कोणत्या ना कोणत्या योजनेच्या माध्यमातून दीड दोन लाखांची सहजपणे वसुली केली जाते. रुग्णालयांना उत्पन्नाची हमी देणाऱ्या या योजनांमुळे त्यांची तंदुरुस्ती वाढत आहे. आतापर्यंत लक्षात न आलेली किंबहुना लक्षात येऊनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेली ही गोष्ट आरोग्याचा खेळ करणारी ठरू नये, एवढीच आमची अपेक्षा आहे.